**MHBU030018702023**

**निशाणी क्र. १२ खाली**

**न्या य नि र्ण य**
(दिनांक २७.१०.२०२५)

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद व न्यायालयासमोर सादर झालेल्या पुराव्याचा विचार करता खालीलप्रमाणे मुद्दे निष्कर्षासाठी काढण्यात येतात, मी त्यावरील उत्तरे कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे दिली आहेत.

२. प्रस्तुत खटल्याचे निर्णयाकरीता खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी खाली नमूद केलेल्या कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २६.०४.२०२३ रोजी आरोपीचे राहते घरासमोर भिलवाडा, बुलडाणा ता.जि. बुलडाणा येथे ०७.४० वाजता तुमच्याकडे एक प्लॅस्टीक कॅन मध्ये १५ हात भट्टी दारु किंमत १५००/- व कॅनसह एकुण १६००/- रुपयाचा मुद्देमाल माल मिळून आला, ही बाब अभियोग पक्ष शाबीत केली आहे काय? | .. नाही |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**- कारणमिमांसा -**

**मुद्दा क्र.१ व २ करीता -**

३. अभियोग पक्षाचा पुरावा संपल्यानंतर आरोपीला गुन्ह्यात गोवणारा पुरावा आढळुन न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन नोंदवण्यात आले नाही.

४. अभियोग पक्षाने आरोपीच्या विरुध्दचे आरोप शाबीत करण्यासाठी केवळ एक साक्षीदार तपासला आहे. साक्षीदार क्र.१ राजु श्रीराम चोपडे (पंच साक्षीदार) याची साक्ष नोंदविण्यात आली. त्याने त्याच्या सरतपासात असे कथन केले की, दिनांक २६.०४.२०२३ रोजी त्याला पोलीसांनी कोठेही बोलाविले नव्हते. साक्षीपुराव्यादरम्यान, सदर साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा दाखविला असता त्यावरील त्याची सही त्याने ओळखली परंतु, त्यामधील मजकूर माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास समर्थन न केल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या पूर्व परवानगीने उत्तरसुचक प्रश्न विचारले असता त्याने सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिलीत. प्रकरणामधील रिपोर्ट व प्रथम खबरी अहवाल सिध्द झालेले नाही. महत्वाचे म्हणजे प्रस्तुत प्रकरणात रासायनिक परिक्षण अहवाल प्राप्त झालेला नाही. किंबहुना फिर्यादी, तपास अधिकारी किंवा ईतर स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष नोंदविणे अपेक्षित होते. एकंदरीत उपरोक्त चर्चेप्रमाणे मी या निष्कर्षाप्रत पोहोचले आहे की, अभियोग पक्षाने नमुद मुद्देमालाची आरोपीकडून जप्ती आणि आरोपीचा गुन्ह्यातील सहभाग ह्या बाबी सिध्द केलेल्या नाहीत. सबब, आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाच्या तरतुदीचा भंग करुन प्रतिबंधीत दारु बाळगली हे संशयापार सिध्द केलेले नाही. सबब, नमुद गुन्ह्याची श्रृंखला स्थापित झालेली नाही.

५. एकूणच अभियोग पक्षाचा पुरावा आरोपीस दोषी धरण्याकरीता पुरेसा नाही. त्यामुळे, अभियोग पक्षाने उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणीआरोपी अवैधरित्या एक प्लॅस्टीक कॅन मध्ये १५ हात भट्टी दारु किंमत १५००/- व कॅनसह एकुण १६००/- रुपयाचा मुद्देमाल जवळ बाळगुन व विक्री करीत असताना मिळून आला ही बाब निःसंशयरित्या शाबीत केलेले नाही. त्यामुळे, मुंबई दारुबंदी कायदा अधिनियम कलम ६५ (ई) चे घटक शाबीत होत नाही. घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन केले असता उर्वरित जप्त मुद्देमाल जागेवरच नष्ट करण्यात आल्याचे नमुद असल्यामुळे

त्याबाबत आदेश नाही. त्यामुळे, मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे. सबब, मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष विचारात घेता मुद्दा क्र. २ बाबत खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी राधाबाई एकनाथ बर्डे, वय – ४० वर्षे, व्यवसाय- मजुरी, रा. भिलवाडा, ता. जि. बुलडाणा, यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५ (१), प्रमाणे मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५ (ई) च्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता ४३७-अ अन्वये रुपये १५,०००/- चे जामीन बंधपत्र सादर करावे. सदर जामीन बंधपत्र सहा महिन्यापर्यंत (अपील कालावधी संपेपर्यंत) अस्तित्वात राहिल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

दिनांक- २७.१०.२०२५. **(पी.ए.खंडारे)**

न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,कोर्ट क्र.४, बुलडाणा